<u>**अतारांकित प्रश्नोत्तरांची आठवी यादी**</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पूर्व विदर्भातील ४ जिल्ह्यात धान खरेदी केंद्रे सुरु करण्याबाबत**

**(१) २५६६ (२४-१२-२०१४). श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानाचे कोठार असलेल्या पूर्व विदर्भातील ४ जिल्ह्यात धान खरेदी केंद्रे सुरु करण्यात आली आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केव्हा नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,
(३) धानाला कोणता भाव देण्यात आलेला आहे व तो शेतक-यांना मान्य आहे काय ?

**श्री. गिरीश बापट (१९-०७-२०१७) :** (१) व (२) होय. पूर्व विदर्भातील गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर व नागपूर या ४ (चार) जिल्ह्यात खरेदी केंद्रावर आधारभूत खरेदी सुरु करण्यात आली आहे.
(३) खरेदी हंगाम २०१६-१७ मध्ये केंद्र शासनाने धान ''अ'' साठी रु. १५१०/- धान ''साधारण'' साठी रु. १४७०/- प्रति क्विंटल दर मंजूर केले आहेत.

---

**राज्यातील वृध्दाश्रम चालविण्याची किती संस्थांना परवानगी दिल्याबाबत**

**(२) ४९५१ (१७-०४-२०१५). श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही वृध्दाश्रम वृध्दांसाठी कोणताही खर्च न करता शासनाची फसवणूक करुन निधीचा दुरुपयोग करित असल्याच्या तक्रारी माहे जानेवारी, २०१५ मध्ये "मिशन जस्टीज" या सामाजिक कार्यकर्त्यांनी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने संबंधित संस्था चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) राज्य शासनाने किती संस्थांना कोणत्या निकषाद्वारे वृध्दाश्रम चालविण्याची परवानगी दिली आहेत,
(४) असल्यास, वृध्दाश्रमातील वृध्दांसाठीच्या योजना काय आहेत,
(५) असल्यास, वृध्दाश्रमात दाखल होण्याची प्रक्रिया काय आहेत तसेच वृध्दाश्रमामधील प्रत्येक वृध्दांवर शासन किती खर्च करीत आहे?

**श्री. राजकुमार बडोले (१३-०७-२०१७) :** (१) नाही. अशी कोणतीही तक्रार शासनास प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही
(३) दि. २० फेब्रुवारी, १९६३ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रातील ६० वर्षावरील वृध्द पुरुष, निराधार निराश्रीत स्त्रिया, अपंगासाठी वृध्दाश्रम सुरु करण्यात आले आहे. वृध्दाश्रमातील वृध्दांना भोजन, कपडे बेडींग, साहित्य, औषधोपचार, इत्यादी सोयी पुरविल्या जातात. दिनांक २०/२/१९६३ च्या शासन निर्णयातील निकषानुसार ३९ अनुदानित वृध्दाश्रम चालविण्याची परवानगी दिली आहे. तसेच वृध्दांना वृध्दापकाळात राहण्याची सोय व्हावी याकरीता मातोश्री वृध्दाश्रम योजना दिनांक १७/११/१९९५ अन्वये मंजूर केलेली आहे. सदर वृध्दाश्रम स्वयंसेवी संस्थेमार्फत विनाअनुदानित तत्वावर कार्यरत आहेत.
(४) वृध्दाश्रमातील वृध्दांसाठी योजना खालीलप्रमाणे आहेत.

१) वृध्दाश्रमात वृध्दांना विनाशुल्क प्रवेश देणे
२) वयाने जास्त वृध्द असलेल्यांना प्राथम्याने प्रवेश देणे
३) महिलांना प्राथम्य देणे
४) जीवनावश्यक सोई - सुविधा पुरविणे
५) वृध्दाश्रमातील लाभार्थ्यांना दरमहा दरडोई रु. ९००/- इतके परिक्षण (परिपोषण) देण्यात येते.
६) विकलांग, अशक्य, निरक्षर व निवासाची सोय नसलेल्या वृध्दांना प्राधन्याने प्रवेश देणे. वृध्दाश्रमात दाखल होण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज करावा लागतो. श्रावणबाळ योजनेंतर्गत ६५ वर्षावरील निराधार वृध्दास दरमहा रुपये ६००/- व एका पेक्षा अधिक लाभार्थी असल्यास रु. ९००/- एवढे अनुदान देण्यात येते.

(५) अनुदानित वृध्दाश्रमात जेष्ठ नागरिकांसाठी विनाशुल्क प्रवेश दिला जातो. अनुदानित वृध्दाश्रमात जेष्ठ नागरिकांसाठी निवास, भोजन, औषध यासाठी दरमहा दरडोई रुपये ९००/- असा परिक्षण (परिपोषण) खर्च करण्यात येतो.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या न्या.अग्यार समितीचा अहवाल जाहीर करण्याबाबत

**(३) ६८५४ (०६-०८-२०१५). श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांचा अभ्यास करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने दिनांक २५ मे, २००७ रोजी वा त्यासुमारास निवृत्त न्यायमूर्ती अग्यार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली होती, हे खरे आहे काय,

(२) या समितीने दोन वर्ष सखोल अभ्यास करुन सन २००९ मध्ये आपला गुप्त अहवाल मा.मुंबई उच्च न्यायालय आणि राज्य शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या समितीवर रुपये ७ कोटी खर्च झाले असून समितीने दिलेला २३ हजार पानांचा गुप्त अहवाल राज्य शासनाने अद्याप खुला केला नाही, हे खरे आहे काय,
(४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामात वाढ होत असल्याने, सदर अहवाल शासनाकडून जाहीर करुन या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला आहे,
(५) अद्याप, निर्णय घेतला नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) मंत्रालयास दिनांक २१/६/२०१२ रोजी लागलेल्या आगीमध्ये सदरचा अहवाल नष्ट झालेला होता. त्यामुळे सदर अहवाल सदस्य सचिव अग्यार समिती, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून दिनांक २५/५/२०१५ रोजी पुन्हा प्राप्त करुन घेण्यात आला असून, सदरचा अहवाल गोपनीय असून सिलबंद लखोटयात आहे.
(४) व (५) सदरचा अहवाल गोपनिय व सिलबंद लखोटयात असून सदर अहवाल खुला करुन त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

---

**कल्याण-डोंबिवली महापालिकेतुन वगळण्यात आलेल्या २७ गावांसाठी ग्रोथ सेंटर निर्माण करण्यास गावकऱ्यांचा विरोध असल्याबाबत**

**(४) १९३६१ (१९-०८-२०१६). ॲड.निरंजन डावखरे :** तारांकित प्रश्न क्रमांक १६८५१ ला दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतुन वगळण्यात आलेल्या २७ गावांसाठी स्वतंत्र विकास प्राधिकरण गठीत करुन ग्रोथ सेंटर निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक २२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रोथ सेंटर निर्माण करण्यास या २७ गावांच्या संघर्ष समितीने प्रचंड विरोध केला असल्याचेही दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाची भुमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदी अन्वये दिनांक ३०/४/२०१६ रोजीच्या अधिसुचनेनुसार कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या अधिसुचित क्षेत्रामधील मौ.भोपर (भाग), संदप, उसरधर (भाग), घारिवली (भाग), माणगांव (भाग), हेदुटणे (भाग), कोळे, काटई (भाग), निळजे (भाग) व घेसर (भाग) या १० गावांमधील सुमारे १०८९ हेक्टर क्षेत्राकरीता ग्रोथ सेंटरसाठी मुंबई

महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नेमणूक कायम ठेवून उर्वरीत क्षेत्रासाठीची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नेमणूक रद्द केली आहे.

(२) या विषयी २५ मे, २०१६ व त्या सुमारास २७ गावांच्या संघर्ष समितीकडून निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येथील ग्रामीण रुग्णालय मुरूड (जि.रायगड) येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५) १९३६९ (२१-०४-२०१७). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड (जि.रायगड) येथील ग्रामीण रूग्णालयात वर्षाला सुमारे ३३ हजार रूग्णांची ओपीडी नोंद होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामीण रूग्णालयात कार्यरत असणारे ३ वैद्यकीय अधिकाऱ्याचा कार्यकाल दिनांक ६ जून, २०१६ मध्ये समाप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुरूड ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक यांनी आरोग्य उपसंचालक, ठाणे यांना लेखी पत्र पाठवून वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त जागाबाबत माहिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) ग्रामीण रुग्णालय, मुरुड, जि.रायगड येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची ३ पदे मंजूर आहेत. सदर पदावर ३ बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी कार्यरत होते. सदर तीन अधिकाऱ्यांच्या बंधपत्राचा कालावधी संपल्यानंतर उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन जि.रायगड येथील वैद्यकीय अधिकारी यांची सेवा दिनांक ३०/०६/२०१६ पासून प्रतिनियुक्तीने ग्रामीण रुग्णालय, मुरुड येथे उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी गट-अ पदावर दिनांक १४/६/२०१६ पासून एक बंधपत्रित वैद्यकीय अधिकाऱ्याची ३६४ दिवसांच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची पद मुलाखतीद्वारे भरण्याबाबतची प्रक्रिया शासन परिपत्रक दिनांक २४/६/२०१६ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**जोगेश्वरी (मुंबई) येथील म्हाडा पोलीस कॉलनीच्या इमारतीचा पुनर्विकास करणेबाबत**

**(६) १९६३९ (१९-०८-२०१६). श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई) येथील म्हाडा पोलीस कॉलनीतील इमारत क्रमांक ६-बी ही मोडकळीस

आली असून सदर इमारतीचा स्लॅब कोसळल्याची घटना दिनांक १२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीत राहणाऱ्या कुटूंबियांना पर्यायी निवासस्थान देणेबाबत व इमारतीचा पुनर्विकास करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर वसाहतीच्या दुरुस्तीसाठी दिनांक ०७/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेली असून दिनांक ०३/१०/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी उपलब्ध करुन दिला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अवयवदानाला मंजूर झालेला ५ कोटींचा निधी अडकून पडल्याबाबत**

**(७) २०४०४ (१८-०८-२०१६). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या आरोग्य संचालनालयाने सन २०१३ पासून रुपये ४३ कोटींचा हिशेब केंद्र शासनाला सादर न केल्याने अवयवदानाला मंजूर झालेला रुपये ५ कोटींचा निधी प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर हिशेब केंद्राला सादर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-०६-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सन २०१५-१६ मध्ये केंद्र शासनाने के.ई.एम. रुग्णालय, मुंबई येथे रोटोच्या स्थापनेकरिता मंजुर केलेला रुपये ६३.२० लक्ष निधी रोखुन धरला होता.
(२) शासनाने दिनांक ७/११/२०१६ रोजीच्या अ.शा. पत्रान्वये रुपये ४२.५३ कोटी पैकी रुपये २७.०१ कोटीचे उपयोगिता प्रमाणपत्र उपसंचालक (नर्सिंग), आरोग्य सेवा, मुंबई यांनी सादर केलेले असल्याने अवयवदानाचा निधी तात्काळ वितरीत करण्याची केंद्र शासनास विनंती केली होती.
त्यानुसार केंद्र शासनाने दिनांक १५/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात मंजुर असलेला एकुण ६३.२० लक्ष निधी उपलब्ध करुन दिला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोबिंवली महापालिका क्षेत्रात नागरी समुह विकासाचे (क्लस्टर) धोरण लागू करण्याबाबत**

**(८) २०७७३ (२३-०८-२०१६). श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोबिंवली महापालिका क्षेत्रात नागरी समुह विकासाचे (क्लस्टर) धोरण लागू करण्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे आदेश नगरविकास विभागाने महापालिकेस दिल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण-डोबिंवली महापालिका क्षेत्रात क्लस्टर धोरण राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये नागरी समूह योजनेची नियमावली प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीच्या समाविष्ट करण्याचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ चा प्रस्ताव आवश्यक त्या आघात मुल्यांकन अहवालासह शासनास मान्यतेकरीता सादर केल्यास शासन त्याविषयी उचित निर्णय घेईल, असे शासनाने आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना दिनांक १८/४/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि, असा प्रस्ताव कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून शासनास अदयाप सादर केलेला नाही.
(२) शासनाने मुंबई महानगर प्रदेशातील बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिका क्षेत्रामधील सिडकोचे क्षेत्र वगळून उर्वरीत महानगरपालिका क्षेत्रासाठीची प्रस्तावित सर्वसमावेशक व एकात्मिकृत विकास नियंत्रण नियमावली महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (कक) अन्वये आम जनतेकडून हरकती/सुचना मागविण्याकरीता दिनांक २८/२/२०१७ रोजी प्रसिध्द केली आहे. या प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी समुह योजनेची नियमावली अंतर्भुत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात तज्ञ डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(९) २०७७६ (२०-०८-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** तारांकित प्रश्न क्रमांक १५९२१ ला दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात तज्ञ डॉक्टरांची १९ पदे मंजूर असताना केवळ चार डॉक्टर कार्यरत असून आवश्यक साधनसामुग्रीची कमतरता असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्णालयातील पदे रिक्त असल्यामुळे कोल्हापूर मंडळाच्या आरोग्य सेवेच्या उपसंचालकाच्या अधिनस्त असलेल्या कोल्हापूर व सांगली जिल्हयातील भूलतज्ञ शासकीय संस्थामध्ये कार्यरत आहेत त्यांना रत्नागिरीमध्ये प्रतिनियुक्ती द्यावी अशी मागणी नागरीकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा शासकीय रुग्णालयात रुग्णांसाठी ब्लड सेपरेशन विभाग, सिटी स्कॅन मशिन अशा सुविधांसाठी डॉक्टर तसेच प्रशिक्षित तंत्रज्ञ नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०६-२०१७) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
(२) सामान्य रुग्णालयातील पदे रिक्त असली तरी उपसंचालक आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांच्या अधिनस्त असलेल्या सांगली जिल्ह्यातील भूलतज्ञ शासकीय संस्थामध्ये कार्यरत आहेत त्यांना रत्नागिरी येथे प्रतिनियुक्ती देण्याबाबतची मागणी नागरिकाकडून प्राप्त झालेली दिसत नाही.
(३) सी.टी. स्कॅन मशिन सद्य:स्थितीत बंद असली तरी स्थानिक दर पत्रके मागवून कमीत कमी दर असलेल्या पुरवठादाराकांकडून सी.टी. स्कॅनची सेवा उपलब्ध केली आहे. तसेच ब्लड सेपरेशन विभागात रक्तपेढीतंत्रज्ञांचे १ पद भरलेले असून त्यांचेमार्फत काम पाहिले जाते. सामान्य रुग्णालय, रत्नागिरी येथे कार्यरत वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी हे उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करुन आरोग्य सुविधा जनतेस उपलब्ध करुन देत आहेत. त्यामुळे रुग्णांची गैरसोयी होत आहे, असे म्हणता येणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना तसेच अल्प भूधारक शेतकऱ्यांना अत्याधुनिक अती विशेषोपचार सुविधा मोफत देण्याबाबत

**(१०) २१३९३ (१८-०८-२०१६). श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना तसेच अल्प भूधारक शेतकऱ्यांना शासकीय रुग्णालयाचे व शासनमान्य सेवा सुविधांसाठी प्राधिकृत रुग्णालयांमधून अत्याधुनिक अती विशेषोपचार (एम आर आय, स्कॅनिंग, सोनोग्राफी) मोफत देण्याचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन स्तरावरून चालविण्यात येणाऱ्या जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये एम आर आय, स्कॅनिंग, सोनोग्राफी या सुविधांच्या समावेश नसल्यामुळे या अती विशषोपचाराकरीता गरीब रुग्णांना शुल्क द्यावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना तसेच अल्प भूधारक शेतकऱ्यांना अत्याधुनिक अती विशेषोपचार सुविधा (एम आर आय, स्कॅनिंग, सोनोग्राफी) मोफत देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-०६-२०१७) :** (१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय रुग्णालयामधून राज्यातील दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिनांक २८/१२/२०१५ च्या शासन निर्णयानुसार विनाशुल्क वैद्यकीय उपचाराची सवलत देण्यात आलेली आहे. तसेच आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील ज्या शेतकरी कुटुंबाकडे शुभ्र शिधापत्रिका आहे. त्याआधारे अथवा ७/१२ उताराऱ्याच्या आधारे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे.

(२) नाही.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये ९७१ उपचार पध्दती समाविष्ट असून या उपचार पध्दतीमध्येच आवश्यक असणाऱ्या सर्व तपासण्यांच्या (एम.आर.आय., स्कॅनिंग, सोनोग्राफी) खर्चाचा समावेश आहे. त्यामुळे योजनेच्या लाभार्थ्यांना वेगळे शुल्क द्यावे लागत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उपसा जलसिंचनासाठी लागणारी वीज सौर ऊर्जेद्वारे निर्माण करण्याबाबत**

**(११) २१९६४ (१९-०८-२०१६). श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण किती उपसा जल सिंचन योजना कार्यान्वित आहेत,

(२) असल्यास, उपसा जलसिंचन योजनेस विजेची वार्षिक गरज किती आहे,

(३) असल्यास, उपसा जलसिंचनासाठी लागणारी वीज सौर ऊर्जेद्वारे निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०७-२०१७) :** (१) सद्य:स्थितीत राज्यात एकूण ५७ उपसा जल सिंचन योजना कार्यान्वित आहेत.

(२) सद्य:स्थितीत सदर योजनांना लागणाऱ्या विजेची वार्षिक गरज ४३६.२३८ मेगावॅट इतकी आहे.

(३) सदर योजनांसाठी लागणारी वीज सौर उर्जेद्वारे निर्माण करण्याबाबत शासन स्तरावरुन धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**मौजे वालशिंद (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथील गावठाणालगत GWR असलेला झोन वगळून U२ किंवा I Zone असा बदल करण्याबाबत**

**(१२) २३४८३ (०४-०१-२०१७). ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.वालशिंद (ता.भिवंडी, जि.ठाणे) या गावासाठी शासनाने सन २०११ मध्ये वा त्यादरम्यान एमआरटीपी अधिनियम कलम (२६) अन्वये विकास योजना प्रसिध्द केली व या

योजनेंतर्गत वाशिंद या गावठाणालगत GWR Zone चे आरक्षण दाखविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या GWR आरक्षणास मौ.वालशिंद ग्रामस्थांनी विरोध करुन सदरचे आरक्षण रद्द करण्याबाबत शासनाकडे मागणी केली असता शासनाने सन २०१२ मध्ये अधिनियमांचे कलम (३०) अन्वये योजनेत सुधारणा करुन सदर गावचा GWR Zone रद्द करुन त्याऐवजी रहिवास मंडळ (R Zone) म्हणून अंतिम केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास सदर गावाच्या विकास योजनेस मंजुरी प्रदान करताना मात्र यापुर्वी प्रस्तावित केलेला रहिवास झोन काढून त्याऐवजी GWR (Ground Water Resource Zone) दर्शवून प्रसिध्द केल्यानंतर त्याबाबत वालशिंद ग्रामस्थांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग, महानगर आयुक्त, मुंबई, महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण, ठाणे व मुंबई यांचेकडे दिनांक १ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास तक्रार निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याप्रकरणी पुन्हा लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना वालशिंद ग्रामस्थांवरील अन्याय दूर करण्याबाबत दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आणूनही अद्याप कार्यवाही झाली नसल्याने दिनांक २४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) होय.

(२) भिवंडी परीसर अधिसुचित क्षेत्राची प्रसिध्द प्रारुप विकास योजनेमधील सदर आरक्षणासंदर्भात प्राप्त सुचना/ हरकती विचारात घेऊन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कलम ३० अन्वये प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीकरीता सादर करताना सदर GWR चे आरक्षण वगळून त्याखालील क्षेत्र रहिवास विभागात व या रहिवास विभागाकरीता अनुषंगिक आरक्षणे प्रस्तावित करुन प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीकरीता सादर केली होती.

(३) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये विकास योजनेस भागश: मंजूरी देताना शासनाने सदरचे GWR हे आरक्षण कायम केले आहे. याबाबत, ई.पी. वरील सुनावणी देण्याकरीता नियुक्त केलेल्या अधिकारी यांचेकडे हरकत प्राप्त झाली होती.

(४) व (५) GWR चे आरक्षण वगळण्याबाबत मा.लोकप्रतिनीधी यांचे दिनांक १९/१/२०१६ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले होते.त्यावर सदर प्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वयेचा उचित तो प्रस्ताव शासनास सादर केल्यास त्यावर शासन गुणवत्तेनुसार निर्णय घेईल, असे अर्जदार यांना दिनांक १६/७/२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले असल्याचे मा.लोकप्रतिनीधी यांना कळविण्यात आले आहे.

---

**मुंबई शहर व उपनगरात पुनर्विकासात नवीन इमारतीचे बांधकाम**
**करुन विकासक सदनिका विकत असल्याबाबत**

**(१३) २३५४७ (०४-०१-२०१७). श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात पुनर्विकासात नवीन इमारतीचे बांधकाम होत असताना मुंबई महानगरपालिकेकडून ओ.सी. (ऑक्युपेशन सर्टिफिकेट) मिळाल्यानंतर विकासक अग्निशमन उद्देशाकरीता राखीव असलेल्या जागेवर (रिफ्युज एरियावर) नंतर सदनिका बांधून विकत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओ.सी. (ऑक्युपेशन सर्टिफिकेट) मिळूनही १०-१५ वर्षे किंवा त्याहीपेक्षा जास्त कालावधीपर्यंत बी.सी.सी. (Building Completion Certificate) जे विकासक घेत नाहीत व विकासकाचे अधिकार अबाधित असल्याचे सांगून सदर इमारतीत आपली मनमानी करुन फेरफार केले जातात असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांची फसवणूक विकासकाकडून होत असून मुंबई शहर व उपनगरात अशा किती इमारती आहेत, त्यानुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार अशा विकासकांवर कायदेशीर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१), (२), (३) व (४) मुंबई शहर आणि उपनगरात पुनर्विकासात नवीन इमारतीचे बांधकाम होत असतांना, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून ओ.सी. मिळाल्यानंतर विकासक अग्निशमन उद्देशाकरिता राखीव असलेल्या जागेवर सदनिका / इतर कोणत्याही प्रयोजनासाठी अनधिकृत बांधकाम करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, महानगरपालिकेच्या संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्यांमार्फत सदर अनधिकृत बांधकाम व बांधकाम करणाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५३ किंवा मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये कारवाई करण्यात येते.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ व विकास नियंत्रण नियमावली १९९१ मध्ये विकासकावर ओ.सी. घेतल्यानंतर बी.सी.सी. घेण्याबाबत कालमर्यादेचे निर्बंध नाहीत.

इज ऑफ डुईंग बिझनेसप्रमाणे ओ.सी. व बी.सी.सी. सोबत देण्यात येते.

---

**मुंबई शहरातील अस्वच्छतेवर मात करण्यासाठी बंद डबे खरेदी करण्याचा घेतलेला निर्णय**

**(१४) २३६८६ (०४-०१-२०१७). श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील अस्वच्छतेवर मात करण्यासाठी बंद डबे खरेदी करण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) व (२) नागरी घन कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०१६ चे पालन करण्याकरिता तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ओला व सुका कचरा संकलीत करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत नगरसेवक तसेच विभागीय निधीतून १० लि., १२० लि., २४० लि., १.१ क्यु.मी. व ५.२ क्यु.मी. क्षमतेचे कचऱ्याचे डबे आवश्यकतेप्रमाणे स्थायी समितीच्या मंजुरीने खरेदी करण्यात येतात.

त्यानुसार सन २०१६-१७ मध्ये महानगरपालिकेमार्फत १० लि. क्षमतेचे १२,४८,००० डबे, १२० लि. क्षमतेचे ३२,००० डबे व २४० लि. क्षमतेचे ३५,००० डबे खरेदी करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा-शिळफाटा रस्त्यावर आणि मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतुक कोंडी सोडविण्याबाबबत**

**(१५) २४९०९ (३०-१२-२०१६). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा-शिळफाटा रस्त्यावर आणि मुंबई-नाशिक महामार्गावर होणाऱ्या अवजड वाहनांमुळे वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत जिल्हा नियोजन मंडळाची दिनांक २० ऑगस्ट, २०१६ रोजी बैठक झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) होय.
(२) मुंब्रा जंक्शन ते ठाणे महानगरपालिकेच्या जकात नाक्यापर्यंत अस्तित्वातील रस्त्याचे रुंदीकरण तसेच मुंब्रा जंक्शन येथे शिळफाटा जंक्शनवर उड्डाणपूल बांधण्याची कामे तीन विभागात करण्याचे नियोजित आहे. पहिल्या भागात मुंब्रा जंक्शन ते सेंट्राईड पर्यंत ६० मीटर रुंदीकरण करुन तेथे उड्डाणपूलाचे काम हाती घेण्याचे नियोजित आहे. दुसऱ्या भागात दोस्ती सेंट्राईड ते ठाणे महानगरपालिकेच्या जकात नाक्यापर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व तिसऱ्या विभागात शिळ जंक्शन ते कल्याण जंक्शन येथे उड्डाणपूलाचे काम हाती घेण्याचे नियोजित आहे.

मुंबई-नाशिक महामार्गावरील माणकोली जंक्शन येथील ठाणे नाशिक दिशेकडील उड्डाणपुलाच्या भागाचे काम पूर्ण झाले असून यावरुन चार मार्गिका वाहतुकीस खुल्या करण्यात आल्याने माणकोली येथील वाहतुकीची कोंडी पूर्णत: संपुष्टात आली आहे. तसेच सदर उड्डाणपुलाच्या नाशिक-ठाणे दिशेकडिल भागाचे काम प्रगतीपथावर असून सदर उड्डाणपूलाचे काम माहे डिसेंबर, २०१७ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

राजणोली जंक्शन येथे उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर असून ठाणे-नाशिक

दिशेकडील चार मार्गिकांचे काम माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. तसेच नाशिक-ठाणे दिशेकडील उड्डाणपुलाचा भाग माहे मे, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचायत समिती स्तरावर सहायक लेखाधिकारी हे पदे स्वतंत्रपणे मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(१६) २५८९९ (१६-१२-२०१६). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडील लेखाविषयक कामे हाताळण्यासाठी पंचायत समिती स्तरावर सहायक लेखाधिकारी हे पदे स्वतंत्रपणे मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावावर केव्हापर्यंत कार्यवाही होणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-०६-२०१७) :** (१) नाही
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महापालिकेंतर्गत येणाऱ्या खाजगी अनुदानित शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक यांची सेवानिवृत्ती प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) २६०५० (०४-०१-२०१७). श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिकेंतर्गत येणाऱ्या खाजगी अनुदानित शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक यांची सेवानिवृत्ती प्रकरणे मागील तीन ते चार वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा हक्क हिरावून घेण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, अनुदान तत्वावर वर्षानुवर्षे कार्यरत शाळांतील कर्मचा-यांचे वेतन सुरु असताना सेवानिवृत्तीवेतन नाकारणा-या अधिकाऱ्यांची शासन चौकशी करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) न्यायालयीन प्रकरणे व निवृत्ती वेतन नियमावलीतील तरतुदीनुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करीत नसल्यामुळे एकूण २३९ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन प्रस्ताव प्रलंबित आहेत.

सदर प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठीचा प्रस्ताव कार्यान्वित असून धोरणात्मक निर्णयास प्रशासनाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

तसेच, न्यायालयीन प्रकरणांमध्ये न्यायालयाचा अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यत येणार आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिल्हा वार्षिक योजनेतून आबलोली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संरक्षक भिंतींच्या निकृष्ट बांधकामाबाबत**

**(१८) २६०९७ (३०-१२-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा वार्षिक योजनेतून आबलोली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या एकूण रूपये १७ लाख ९८ हजार खर्चाच्या संरक्षक भिंतींच्या निकृष्ट कामामुळे संबंधित ठेकेदाराला बिलाची रक्कम अदा करण्यात येऊ नये, असा गुहागर पंचायत समितीने ठराव घेतलेला असतानाही बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सदर कंत्राटदाराला रूपये ९ लाख ६६ हजार ७७४ चे अंशत: देयक अदा केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पंचायत समिती पदाधिकारी यांनी कोणती भूमिका घेतली आणि जबाबदार संबंधित विभागाचे दोषी अधिकारी व ठेकेदाराविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही. तथापि, गुहागर पंचायत समितीच्या दिनांक १८/३/२०१६ च्या मासिक सभेत सदर काम निकृष्ट दर्जाचे झालेल्या चर्चानुसार काम थांबविण्याबाबत सूचना देण्यात आली. त्यानुसार काम थांबवून प्रत्यक्ष पाहणी केली असता सदरहू काम योग्य दर्जाचे आढळून आल्याने झालेल्या कामाचे देयक रुपये ९,६६,७७६/- अदा करण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणी कामाचा दर्जा व चाचणी निकषही समाधानकारक आहे. तथापि, ठेकेदाराने विहीत मुदतीत काम पूर्ण केलेले नाही. त्यामुळे त्यांना रुपये १७९३१/- (११% दाराने) दंड आकारुन दिनांक ३१/३/२०१६ पर्यंत काम पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, अतिक्रमण इत्यादी बाबीमुळे सदर काम दिनांक २४/०४/२०१७ रोजी पूर्ण झालेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुष्ठरोग शोध अभियान राबविण्याबाबत**

**(१९) २६३१९ (१६-१२-२०१६). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ जिल्ह्यात कुष्ठरोग शोध अभियान माहे सप्टेंबर, २०१६ ते दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत राबविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभियानाच्या माध्यमातून झीरो लेप्रसी मोहीम यशस्वी करण्यात येणार असल्याचे मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात जाहीर केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सध्या १० हजार १०३ रुग्ण कुष्ठरोगग्रस्त असून दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ ते दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत सापडलेल्या कुष्ठरोगग्रस्त रुग्णालाही या अभियानाच्या माध्यमातून बहुविध औषधोपचार करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अभियान संपूर्ण राज्यभर राबविण्यात येणार काय सदर अभियानाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०३-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.,

राज्यातील १६ जिल्हयात त्वचारोग शोध अभियान माहे १९ सप्टेंबर, २०१६ ते ०४ ऑक्टोबर,२०१६ या कालावधीत राबविण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

"झीरो लेप्रसी मोहीम" असे जाहीर करण्यात आलेले नाही. मात्र कुष्ठरोग शोध अभियानाच्या माध्यामातून अभियान राबविण्यात येणाऱ्या १६ जिल्हयामध्ये घरोघरी सर्व्हेक्षण करून जास्तीत जास्त कुष्ठरूग्ण शोधून त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात येईल असे मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांनी दि.१६ सप्टेंबर २०१६ रोजी जाहीर केले होते

(३) हे खरे आहे.

राज्यात माहे मार्च, २०१६ अखेर १०१०३ कुष्ठरूग्ण उपचाराखाली होते व नोव्हेंबर, २०१६ अखेर ११८३२ इतके रूग्ण उपचाराखाली आहेत. तसेच अभियानाच्या सुरूवातीला जाहीर केल्याप्रमाणे दि. १९ सप्टेंबर ते दि. ४ ऑक्टोबर, २०१६ व त्यानंतर दि.२२ ऑक्टोंबर,२०१६ पर्यंत करण्यात आलेल्या १६ जिल्हयांमधील सर्व्हेक्षणातून ४१३४ निदान झालेल्या रूग्णांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात आले आहे.

४) सदर अभियान राज्यभर राबविण्यात आले नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार, मागील तीन वर्षात एक पेक्षा जास्त कुष्ठरूग्णाचे प्रमाण (पी.आर.) असलेल्या १६ जिल्हयातच हे अभियान राबविण्यात आले आहे. अभियानाव्दारे घरोघरी सर्व्हेक्षण करून जास्तीत जास्त कुष्ठरूग्ण शोधून त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणणे हे अभियानाचे स्वरूप होय.

---

**राज्यातील ४०० धरणे असुरक्षित असल्याबाबत**

**(२०) २६८१३ (१५-०४-२०१७). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सन २०१३ च्या धरण स्थिती अहवालाप्रमाणे एकूण १२२६ मोठ्या धरणांपैकी (वर्ग १ व वर्ग २) ४०२ धरणांवर आढळून आलेल्या संवर्ग २ त्रुटी दुरूस्त करुन या त्रुटींकडे त्वरीत लक्ष देणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरण सुरक्षितता संघटनेच्या अहवालानुसार करावयाच्या सुधारणा व त्यावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी संचालक, मेरी यांच्यावर सोपविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धरणांच्या दुरूस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) होय.

(२) धरण सुरक्षितता संघटनेच्या वार्षिक धरण स्थिती अहवालानुसार धरणाच्या त्रुटींच्या निराकरणाबाबत संबंधित क्षेत्रियस्तरावरून कार्यवाही होणे अपेक्षित असून त्यावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी महासंचालक, मेरी, नाशिक हयांच्यावर शासन पत्र क्रमांक संकिर्ण २०१४/(५६१/१४) सिं.व्य.(कामे), दिनांक १२/०२/२०१५ नुसार सोपविण्यात आलेली आहे.

(३) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.देवदु २०१५/(८३६/२०१५) सिंव्य (कामे), दिनांक १७/११/२०१६ अन्वये पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातील तरतूदीनुसार सिंचन प्रकल्पाचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळाकडे वर्ग करण्यात आले आहे. तसेच पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार देखभाल दुरूस्तींच्या कामांना आवश्यकतेनुसार महामंडळाकडून निधीची उपलब्धता करून कामे करणे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माजी सैनिकांना शासकीय, निम-शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(२१) २६८२८ (१४-०४-२०१७). श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजी सैनिकांना शासकीय, निम-शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत १५% आरक्षणाचा फायदा पुर्णत: मिळत नसून १५% आरक्षणात पोट-जातीमध्ये विभागणी केली जाते परंतु, या प्रवर्गातील व्यक्ती न मिळाल्यास त्या जागा रिक्त ठेवल्या जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, “क” व “ड” प्रवर्गामधील माजी सैनिकांना वयात सवलत मिळते परंतु, “ब” प्रवर्गात पात्र उमेदवारांना सवलत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी करुन जास्तीत जास्त माजी सैनिकांना शासकीय व निम-शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) माजी सैनिकांना शासकीय, निम-शासकीय नोकरीत सामावून घेण्याबाबत १५% आरक्षणाचा फायदा पुर्णत: मिळत नसून १५% आरक्षणात पोट-जातीमध्ये विभागणी केली जाते परंतु, या प्रवर्गातील व्यक्ती न मिळाल्यास त्या जागा रिक्त ठेवल्या जातात, हे खरे आहे काय,

माजी सैनिकाना राज्य शासनाच्या सेवेत गट क व ड च्या पदावर सामावून घेण्यासाठी १५% समांतर आरक्षण विहित करण्यात आलेले आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयाप्रमाणे समांतर हे आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण (Compartmentalized Reservation) आहे, म्हणून पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत केवळ सामाजिक आरक्षणाची पदसंख्याच नमूद न करता सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा, अ.ज, वि.ज. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. आणि खुला प्रवर्ग ) विशेष आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्यासुध्दा निर्देशित करावे लागते.

आरक्षित प्रवर्गातील माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास सदरचे आरक्षण एक भरती वर्ष पुढे ओढण्यात येते जेणे करुन माजी सैनिकासाठी आरक्षित पद भरली जावीत.

(२) हे खरे नाही.

शासन निर्णय कमांक आरटीए-१०८८/११९२/सीआर-३२/८९/१६-अ दिनांक २८/०५/१९९२ अन्वये माजी सैनिक/आणीबाणी राजदिष्ठ अधिकारी/अल्पसेवा राजादिष्ठ अधिकारी यांना शासकीय सेवेत वर्ग-१ व वर्ग-२ मधील पदावर नेमणुकीसाठी वयोमर्यादेत शिथिलता देण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल मधील प्रधानमंत्री आरोग्य योजनेंतर्गत 'ए' विंगचे बांधकाम न झाल्याबाबत**

**(२२) २७००५ (१७-०४-२०१७). प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल मधील प्रधानमंत्री आरोग्य योजनेंतर्गत 'ए' विंगचे बांधकाम होत असून सदर काम गेल्या ४ वर्षापासून सुरू असून अपूर्ण असल्याचे दिनांक २७ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर 'ए' विंगचे बांधकाम पुर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१७) :** (१) व (२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या "ए" विंगमध्ये तीन वार्डाचे बांधकामासह इतर ५ बांधकामास शासन निर्णय दिनांक १२/०१/२०११ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर कामे प्राधान्यक्रमानुसार करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली. दरम्यान मूळ अंदाजपत्रकातील समाविष्ठ बाबींमध्ये वाढ झाल्याने सदर कामाच्या सुधारित अंदाजपत्रकास शासन निर्णय दिनांक २४/५/२०१६ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर बांधकामाकरीता निविदा प्रक्रिया राबवून सदर बांधकाम हाती घेण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील वनविभागांतर्गत येणाऱ्या परिसरात बिबटयांकडून नागरीक व पाळीव प्राण्यांवर होणारे हल्ले रोखण्याबाबत**

**(२३) २७१४५ (१५-०४-२०१७). श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या दोन वर्षात पुणे वन विभागांतर्गत येणाऱ्या परिसरात बिबटयांकडून नागरीकांवर व पाळीव जनावरांवर अनेक हल्ले करुन त्यांचा जीव घेतल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिवीत हानी रोखण्याबाबत वनविभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०६-२०१७) :** (१) सन २०१६-१७ या कालावधीत पुणे वनविभागांतर्गत बिबट्याच्या हल्ल्यात मनुष्य मृत्यूची एक व मनुष्य जखमीच्या तीन घटना तर पशुधन हानीची ७३५ प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

(२) पुणे वनविभागांतर्गत वन्यप्राण्यांचे हल्ले रोखण्याच्यादृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• मानव-वन्यप्राणी संघर्ष होत असलेल्या गावांमध्ये गस्तीचे प्रमाण वाढविण्यात आले आहे.

• मानव-वन्यप्राणी संघर्षाच्या अनुषंगाने स्थानिक जनतेमध्ये प्रबोधन करण्यात येते.

• पुणे वन विभागातील माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात बिबट्यांची क्षमता वाढविण्यात आली आहे.

• नागरी क्षेत्रात / वस्तीमध्ये बिबट्यांच्या वावरावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने स्थानिक लोकांच्या सहभागातून जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आली आहे.

• वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तीच्या कादेशीर वारसास, संबंधित जखमी व्यक्तीस, शेतपिक नुकसानी प्रकरणी संबंधित शेतकऱ्यास तसेच पशुहान हानी प्रकरणी संबंधित पशुधनाच्या मालकास प्रचलित शासन निर्णयान्वये नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

• वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांपासून घ्यावयाच्या काळजीबाबतची माहिती देणारी पोष्टर्स ठिकठिकाणी लावण्यात येतात.
• वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांपासून घ्यावयाच्या काळजीबाबत स्थानिक ग्रामस्थांचे कार्यशाळेचे आयोजन करुन घडीपत्रकांचे वाटप करण्यात येते.
• आवश्यकता भासल्यास वन्यजीव संरक्षण (अधिनियम), १९७२ च्या नियमांतील तरतूदीच्या अनुषंगाने उपद्रवग्रस्त वन्यप्राण्याला पकडण्यासाठी पिंजरे लावण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील व्याघ्र दर्शनाकरिता लागणारे सर्व शुल्काबाबतचे व्यवहार कॅशलेस करण्याबाबत**

**(२४) २७२४३ (१५-०४-२०१७). श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील व्याघ्र दर्शनाकरिता सफारीचे ऑनलाईन बुकिंग करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुकिंग करण्यात आलेल्या वाहनाचा खर्च व व्याघ्र दर्शनाकरिता भरावे लागणारे सर्व शुल्काबाबतचे व्यवहार अजूनही रोखीने सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात प्रवेश करण्याकरिता असलेल्या सर्व प्रवेशद्वारांवरील शुल्काबाबतचे व्यवहार बँकेमार्फत वा कार्डामार्फत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०६-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व्याघ्र दर्शनाकरीता प्रकल्पात सफारीसाठी जाण्याची प्रवेश शुल्काची रक्कम ही ऑनलाईन बुकींग करताना महाऑनलाईन कंपनीच्या महाइकोटुरिझम या वेबपोर्टल वरुन स्विकारण्यात येते. मात्र प्रकल्पात पर्यटकांना जंगल सफारी ही जिप्सीने करणे सक्तीचे करण्यात आले आहे. सर्व प्रवेश गेटवर उपलब्ध असलेल्या जिप्सी या खाजगी असल्याने जिप्सी मालक/चालक हे पर्यटकांकडून जिप्सीचे भाडे शुल्क हे रोखीने अथवा धनादेशाव्दारे वसूल करतात. याशिवाय मार्गदर्शकाचे (Tourist Guide) शुल्क सुध्दा पर्यटकांकडून रोखीने वसूल करण्यात येते.
(३) खाजगी जिप्सी व मार्गदर्शकांचे शुल्क वसुल करण्यासाठी प्रवेश गेटवर माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये एचडीएफसी या बँकेमार्फत तीन पीओएस (३-POS) मशीन प्रायोगिक तत्वावर अनुक्रमे मोहर्ली व कोलारा या प्रवेश गेटवर कॅशलेस व्यवहार करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी एक पीओएस मशीन ही प्रकल्प कार्यालयातील बुकींग कक्षात उपलब्ध असून कॅशलेस व्यवहार करण्यासाठी पर्यटकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर शासकिय वैद्यकिय महाविद्यालयातील पदे मंजूर करण्याबाबत**

**(२५) २७३१३ (१५-०४-२०१७). प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाकरीता ४ टप्यात ५७१ पदांना मंजूरी देण्यात आल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे भरण्यासंबधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
दिनांक ०९/०१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथे ५०० खाटांच्या रुग्णालयाकरिता एकूण ५७१ पदांची ४ टप्प्यात निर्मिती करण्यात आली आहे.
(२) सदरची पदे भरण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ढालेगाव (ता.पाथरी, जि.परभणी) क्षेत्रातील पुलांच्या कामाची अंदाजपत्रके प्रचलित दरसूचीनुसार करण्याबाबत**

**(२६) २७५०० (१७-०४-२०१७). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ढालेगाव (ता.पाथरी, जि.परभणी) उच्च पातळी बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रात येणाऱ्या चारही पुलांच्या कामाची अंदाजपत्रके प्रचलित दरसूचीनुसार सादर करण्याचे आदेश मुख्य अभियंता, जलसंपदा, औरंगाबाद यांनी अधिक्षक अभियंता, नांदेड यांना सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त आदेशान्वये अधिक्षक अभियंता यांनी सुधारीत अंदाजपत्रके सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कामांसाठी मंजुरी व निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) ढालेगांव उच्च पातळी बंधारा हा शंकररावजी चव्हाण विष्णूपुरी प्रकल्पाच्या भाग-२ मध्ये अंतर्भूत असून, शंकररावजी चव्हाण विष्णूपुरी प्रकल्पाचे पंचम सुधारित अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेच्या कार्यवाहीत आहे. या पंचम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावात सदर चार पुलांचा समावेश केला आहे. प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावित चार पुलांची कामे होती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माळवाडी (ता.पलुस, जि.सांगली) येथील शालेय विद्यार्थिनीची हत्या झाल्याबाबत

**(२७) २७६०१ (१३-०४-२०१७). डॉ.अपूर्व हिरे, श्री.रामराव वडकुते, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिलवडीजवळील (ता.पलुस, जि.सांगली) माळवाडी येथील इयत्ता ८ वी च्या वर्गात शिकणाऱ्या १४ वर्षीय शालेय विद्यार्थिनीवर सामुहिक बलात्कार करून तिची निघृण हत्या झाल्याची घटना दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली व या घटनेच्या निषेधार्त ठिकठिकाणी मुक मोर्चा, निदर्शने व आंदोलन करून पंचक्रोशीत बंद पाळण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोपर्डी घटनेनंतर राज्यात ठिकठिकाणी प्रचंड संख्येचे मुक मोर्चे काढून बलात्कार घटनेतील दोषींना कठोर शिक्षा करण्याची मागणी केली जात असतांना आणि महिला अत्याचार प्रकरणी समाजात संतप्त भावना असतांना महिला अत्याचारांच्या घटनांना कुठेही पायबंद बसलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिला अत्याचाराविरोधात मोठ्या प्रमाणात समाज जागृती होवूनही गुन्हेगार प्रवृत्तींच्या व्यक्ती तसेच शाळा-महाविद्यालय परिसरात मुलींची छेड काढणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाचा कोणताही वचक नसल्याने याप्रवृत्ती फोफावल्या असून त्याचीच परिणिती अशा घटनांमध्ये दिसून येत असल्याची जनतेची भावना झाल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१७) :** (१) सदर घटनेच्या अनुषंगाने मुकमोर्चे, कँडलमार्च, निदर्शन करुन गावामध्ये बंद पाळण्यात आला होता. मृत घटनेबाबत आरोपीविरुध्द भिलवडी पोलीस ठाणे गु.र.नं.२/२०१७ भादंवि कलम ३०२, ३७६(अ), बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ४, ६, ८ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. गुन्हयातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(२) व (३) हे खरे नाही,

शाळकरी मुली व महिलांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने निर्भया पथक, महिला दक्षता समिती स्थापन करण्यात आले आहे. निर्भया पथकाकडून पेट्रोलिंग केली जात असून प्रतिसाद ॲपचे प्रबोधन करुन महिलांना व शाळकरी मुलींना संरक्षण पुरविले जात आहे. मुली व महिलांवरील अत्याचाराची त्वरीत दखल घेवून कायदेशीर व प्रतिबंधात्मक कारवाई केली जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुन्हे व गुन्हेगार शोध संपर्क प्रणाली (सीसीटीएनएस) हा महत्वाकांक्षी प्रकल्प कार्यान्वित करणेबाबत

**(२८) २७९४० (१३-०४-२०१७). अॅड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुन्हे व गुन्हेगार शोध संपर्क प्रणाली (सीसीटीएनएस) हा महत्वाकांक्षी प्रकल्प आता प्रत्यक्षात कार्यान्वित होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्रत्येक पोलीस ठाणे व वरिष्ठ अधिका-यांची कार्यालये जोडण्यासाठीच्या यंत्रणेकरिता आवश्यक असलेला २२ कोटी रुपयांचा निधी पोलीस विभागाकडे सुपूर्द करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महत्वाकांक्षी प्रकल्पाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच प्रकल्पाचे काम कोणामार्फत करुन घेतले जाणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१७) :** (१) केंद्र शासनाच्या निदेशानुसार राज्यात सीसीटीएनएस प्रकल्प दिनांक १५/०९/२०१५ पासुन कार्यान्वित करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर प्रकल्पांतर्गत राज्यातील एकूण १०५४ पोलीस ठाण्यांमध्ये पुर्णपणे ऑनलाईन FIR नोंदणी प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानुसार सर्व गुन्ह्यांची नोंद ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत राज्यातील एकुण ६२७ वरीष्ठ पोलीस कार्यालये या यंत्रणेशी जोडण्यात आली आहेत. या प्रकल्पाचे काम मे. विप्रो प्रा. लि. या कंपनीमार्फत करण्यात आले आहे. आतापर्यंत केंद्र शासनाने या प्रकल्पासाठी सुमारे रु.११० कोटी एवढा निधी वितरीत केला आहे. तसेच राज्य शासनामार्फत या प्रकल्पासाठी रु. १६,०४,६२,९९९/- एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील टेमघर धरणाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२९) २७९९९ (१५-०४-२०१७). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील टेमघर धरणाचे बांधकाम निकृष्ट झाल्याप्रकरणी रानडे समितीने दिनांक ३० जून, २०१६ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालात धरणाचे कमी प्रतीचे कामास संबंधित कंत्राटदार व कामावर पर्यवेक्षण करणारे जबाबदार असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी अधिकाऱ्यांवर खोटे दस्तऐवज करून शासन निधीच्या अपहाराबाबतचे आरोप ठेवण्यात आले आहेत व चौकशी प्रस्थापित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) १) टेमघर प्रकल्पावर कार्यरत असणा-या एकूण २५ अधिकारी व कर्मचारी आणि संबंधित ठेकेदार यांचेविरुध्द पौड, पोलीस स्टेशन, ता.मुळशी, जि. पुणे येथे दि. १८/८/२०१६ रोजी भा. द. वि. कलम ४०६, ४०९, ४६७, ४६८, ४७१, ४२० आणि १२०(ब) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

२) त्यापैकी सध्या कार्यरत असलेल्या एकूण ९ अधिकारी व कर्मचारी यांना म.ना.से. (शि.व अ.) नियम १९७९ च्या नियम ४ च्या पोटनियम (१/(अ)व (क) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन दि. ०३/०९/२०१६ च्या आदेशान्वये तात्काळ निलंबित करण्यात आले आहे.

३) संबंधित कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील पाण्याची चोरी व गळती रोखण्याबाबत**

**(३०) २८१३८ (१४-०४-२०१७). श्री.सुजितसिंह ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत पाणी गळतीमुळे ७०० दक्षलक्ष लीटर तर १६० दक्षलक्ष लीटर पाण्याची टँकर लॉबीकडून अनेक ठिकाणी जलवाहिन्या फोडून पाणी चोरी करण्यात येत असल्याचे प्रकार सुरू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालवणी (मुंबई) येथील नवीन कलेक्टर कंपाऊंडमध्ये महापालिकेच्या जलजोडणीतून अनधिकृतपणे जोडणी घेऊन स्थानिक पाणी माफियांकडून मोठया प्रमाणात पाण्याची तसेच वीजेची चोरी होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकृत कर भरणा-या जनतेस पाण्याचा अपुरा पुरवठा होत असताना, दररोज ७०० दक्षलक्ष लीटर पाण्याची गळती व चोरी तसेच वीज चोरीच्या प्रकरणाची शासनाने दखल घेवून माफियांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) महानगरपालिकेच्या पी/उत्तर विभागातील मालवणी न्यू कलेक्टर कंपाऊंड येथे दिनांक १६/०१/२०१७ ते ०८/०४/२०१७ या कालावधीत एकूण १६ अनधिकृत जलजोडण्यांवर महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आली आहे.

सन २०१६-१७ मध्ये महानगरपालिकेमार्फत एकूण ४४६३ अनधिकृत जलजोडण्या खंडीत करण्यात आल्या आहेत.

तसेच, पाण्याची गळती शोधण्यासाठी महानगरपालिकेची विभागनिहाय गळती शोधक पथके कार्यरत असून, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या पध्दतीने गळती शोधण्याचे काम जल वितरण सुधारणा कार्यक्रमांतर्गत सुरु आहे.

सन २०१६-१७ मध्ये मालवणी येथे २४९ ठिकाणी वीज चोरीची प्रकरणे आढळली असून, मालवणी पोलीस ठाण्यामध्ये सदर वीज चोरीच्या ८ प्रकरणांत एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगांव (मुंबई) परिसरात तरुणाची हत्या करण्यात आल्याबाबत**

**(३१) २८३२८ (१३-०४-२०१७). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव (मुंबई) परिसरातील आरे सब पोलीस ठाण्याच्या हद्दीत ब्रॅण्डन गोन्साल्विस या २२ वर्षीय तरुणाची हत्या करण्यात येऊन त्याचा मृतदेह धडापासून वेगळा करण्यात आल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मृत तरुणांच्या मानेवर एकच मोठा वार असुन बाकी शरीरावर कोणतीही जखम नसल्याचे पोलिसांनी सांगितले असून ही घटना नरबळी असल्याचा दाट संशय असून या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७) :** (१) होय, सदर घटनेची माहिती दिनांक २२/१२/२०१६ रोजी मिळाली आहे.

(२) सदरहू मृत तरुणाच्या मानेवर धारदार शस्त्राने अज्ञात इसमानी वार करुन त्याचे मुंडके धडापासून वेगळे केलेले असून त्याच्या कपाळावर व हाताच पंजावर अधिक चिन्ह धारदार शस्त्राने कोरण्यात आलेले आहे. तसेच नमुद घटना ही नरबळी असल्याबाबतचे कोणतेही पुरावे आढळून आलेले नाही.

याबाबत आरे पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१५८/१६ भादंवि कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल असून गुन्हा तपासाधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील अरुणावती डाव्या कालव्याचे कॉक्रीटीकरण शासनाच्या गुणवत्ता दर्शक तत्वानुसार झाले नसल्याने कालव्यातून पाणी वाहून जात असल्याबाबत**

**(३२) २८४७० (१५-०४-२०१७). श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंद ठाकूर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील अरुणावती डाव्या कालव्याचे कॉँक्रीटीकरण शासनाच्या गुणवत्ता दर्शक तत्वानुसार झाले नसल्याने कालव्यातून मोठया प्रमाणात पाणी वाहून जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर कालव्याचे दुरुस्तीचे काम शासनाच्या गुणवत्ता दर्शक तत्वानुसार करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (**१) नाही. अरुणावती प्रकल्पाचा डावा कालवा अस्तरीकरण विरहीत आहे. फक्त निवडक भागात अस्तरीकरण केले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील यमाई तलाव परिसरातील जैवविविधता मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात आल्याबाबत**

**(३३) २८६३२ (१५-०४-२०१७). श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे एकेकाळी हजारो परदेशी पक्ष्यांची पंढरी म्हणून प्रसिध्द असलेल्या यमाई तलाव परिसरातील जैवविविधता तसेच परदेशी पक्ष्यांचे जीवन मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परदेशी पक्ष्यांचे जीवन सुरक्षित राहण्यासाठी पंढरपूर नगरपालिका व पोलीस प्रशासन यांना होत असलेल्या मानवी हस्तक्षेपास तातडीने प्रतिबंध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०६-२०१७) :** (१) व (२) यमाई तलावाचे क्षेत्र वन विभागाच्या अखत्यारीत नाही. सदर क्षेत्राचे देखभाल व संरक्षण नगरपरिषद पंढरपूर यांचेकडे आहे. सदर परिसरातील अवैध शिकार झाल्याचे वन विभागाच्या निदर्शनास आलेले नाही.

तथापि उपवनसंरक्षक, सोलापूर यांनी सदर प्रकरणी मुख्याधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर यांना विचारणा केली असता त्यांनी अंशत: खरे असल्याचे नमूद केले आहे.

पंढरपूर नगरपरिषदने खबरदारीचा उपाय म्हणून तलावाकडे जाण्यायेण्याच्या रस्त्यावर जे.सी.बी. च्या सहाय्याने चर केले आहेत. तसेच तेथील देखभाल, वृक्षांची निगा राखण्याचे काम नगरपरिषदेकडून केले जात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने आर्थिक गुन्हे शाखेसाठी स्वतंत्र उपअधिक्षक दर्जाचा अधिकारी नेमण्याबाबत**

**(३४) २८६३६ (१३-०४-२०१७). श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सध्या राज्यात वर्षाला साधारण १०० च्या आसपास मोठे आर्थिक गुन्हे विविध पोलीस ठाण्यांमध्ये नोंदवले जात असून या मोठया गुन्हयांमधील रक्कमेची व्याप्ती साधारण अडीच हजार कोटीपर्यंत असून जवळपास साडेपाच हजार कोटींचा नॅशनल स्पॉट एक्स्चेंज गैरव्यवहार मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेने नुकताच निदर्शनास आणला असून याची दखल घेत शासनाने आर्थिक गुन्हे शाखेसाठी स्वतंत्र उपअधिक्षक दर्जाचा अधिकारी प्रत्येक जिल्हयात नेमण्यास गृह विभागाने मान्यता दिली असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप किती जिल्हयात आर्थिक गुन्हे शाखेसाठी स्वतंत्र उपअधिक्षक अधिकारी नेमण्यात आले आहेत,

(३) तसेच, राज्यातील सर्व जिल्हयात किती कालावधीत आर्थिक गुन्हे शाखेसाठी उपअधिक्षक नेमण्यात येणार आहेत, त्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१७) :** (१) गृह विभाग शासन निर्णय दिनांक ०५/०१/२०१७ अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या विविध घटक कार्यालयाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेली पोलीस उपअधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त यांची पदे ३२ जिल्हयामधील आर्थिक गुन्हे शाखेकरीता स्थानांतरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) विविध जिल्हयात आर्थिक गुन्हे शाखेसाठी उक्त प्रमाणे निर्माण करण्यात आलेल्या ३२ पदांपैकी ०७ पदांवर पोलीस उपअधिक्षक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या पोलीस उपअधिक्षक संवर्गाच्या एकुण ७०२ मंजूर पदांपैकी १८९ पदे रिक्त असून सदर पदांपैकी पदोन्नती कोट्यातील १५६ पदांवर पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड शहरातील नव्याने उभारण्यात आलेल्या रस्त्यांच्या बाजूचे सायकल ट्रॅक काढणेबाबत**

**(३५) २९०४४ (१३-०४-२०१७). श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील नव्याने उभारण्यात आलेल्या रस्त्यांच्या बाजूने सायकल ट्रॅक तयार केलेला असून त्यामुळे वाढती लोकसंख्या व वाढत्या वाहनांमुळे वाहतूकीत अडचण निर्माण होत असल्याने सदरील सायकल ट्रॅक काढणेबाबत लोकप्रतिनिधी व जनतेकडून वेळोवेळी मागणी होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१७) :** (१) व (२ ) नांदेड शहरात उभारण्यात आलेल्या सायकल ट्रॅक काढण्याबाबत लेखी स्वरुपात महानगरपालिकेकडे मागणी प्राप्त झालेली नसून याबाबत लोकप्रतिनिधींकडून अनौपचारिक चर्चा झालेली आहे.

राष्ट्रीय शहर वाहतुक धोरणानुसार सदर सायकल ट्रॅक बंधनकारक असून, विदयमान सायकल ट्रॅक वापरात आणण्यासाठी जनजागृती करण्याची कार्यवाही नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील गोसेखुर्द धरणाचे पाणी अडविल्यामुळे वैनगंगा नदीचा प्रवाह बंद झाल्याबाबत**

**(३६) २९१०४ (१५-०४-२०१७). श्री.परिणय फुके :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्यातील गोसीखुर्द धरणाचे पाणी अडविल्यामुळे वैनगंगा नदीचा प्रवाह बंद होऊन नदीपात्रात पाण्याची उंची वाढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैनगंगा नदीपात्रात पारंपारिक पध्दतीने मासेमारी व वाळूमध्ये टरबूज, काकडी, डांगरु इ. पिक करुन उपजिवीका करणाऱ्या गरीब ढिवर समाजाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) होय.

(२) नाही, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय दि.०७/०८/२०१२ अन्वये गोसीखुर्द प्रकल्पाचे मासेमारी हक्क, मत्स्य व्यवसाय विभागाकडे हस्तांतरीत केले असून

प्रकल्पात पाणीसाठा करुन लाभक्षेत्रातील भूधारकास सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्याचे धोरण असल्याने त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे कुठल्याही समाजाची गैरसोय होत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेने अधिकारी-कर्मचा-यांना अल्पदरात भाडेपट्टयाने दिलेल्या भुखंडावरील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(३७) २९२०५ (१४-०४-२०१७). श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने आपले अधिकारी कर्मचा-यांना अल्पदरात भाडेपट्टयाने दिलेल्या भुखंडावरील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकास योजनेला चालना देण्यासाठी प्रशासनाने नवीन धोरण आखले असून या धोरणाला सुधार समितीने मंजूरी दिली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे

(३) असल्यास, या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर धोरणाचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे :-

- महापालिकेच्या सेवेत सलग ३ वर्षे सेवा कालावधी पूर्ण करणारे मानीव कायमत्व प्राप्त झालेले मनपा कर्मचारी तसेच सेवानिवृत्त महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सदस्यत्व.
- सदर कर्मचाऱ्याच्या नावे मुंबई शहरात मालकी हक्काचे निवासस्थान नसावे.
- विकास हक्क हस्तांतरणानुसार उपलब्ध होणाऱ्या सदनिकांचे सभासदत्व देण्यात येणारे १००% सभासद हे महापालिका कर्मचारी असणे आवश्यक असल्याने प्रतिक्षायादी तयार करण्यात येणार नाही.
- सद्य:स्थितीत आकारल्या जाणाऱ्या रकमेचे मूल्य फारच कमी असल्यामुळे यापुढे नवीन सदस्यांना प्रति सदस्य रु. २५,०००/- इसारा रक्कम म्हणून आकारण्यात येतील.
- वाढीव चटईक्षेत्र व हस्तांतरणीय विकास हक्कमधून उपलब्ध होणाऱ्या सदनिकांचा लाभ घेण्याकरिता सध्या अस्तित्वात आलेले सभासद पुढे आल्यास त्यांना टी.डी.आर. चा लाभ मिळेल.
- नवीन नामनिर्देशित सभासदांस वरील धोरणाचा फायदा न मिळता त्यांना प्रचलित धोरणाचा फायदा मिळेल.
- एक रकमी अधिमुल्य घरगुती वापरासाठी ५% दराने व व्यावसायिक वापरासाठी

१०% दराने आकारण्यात येईल.

• वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक / हस्तांतरणीय विकास हक्क उपलब्ध होणाऱ्या सदनिकांचा लाभ घेतलेल्या सदनिकाधारकांस भुईभाडयाची आकारणी प्रचलित धोरणाप्रमाणे जुन्याच दराने म्हणजेच सदनिकेचे वाटप करण्यास मंजुरी देण्यात आलेल्या दिनांकास प्रचलित असलेल्या सिध्दगणक दराच्या २५% च्या १५% दराने भुईभाडे आकारण्यात येईल.

• महापालिका कर्मचाऱ्यांना सदनिका हस्तांतरणाकरिता संस्थेस ताबा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर १५ वर्षे कालावधी अथवा सेवानिवृत्ती ही अट कायम राहील.

(३) व (४) महानगरपालिका प्रशासनाने सुधारीत धोरण सुधार समिती व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मान्यतेसाठी सादर केले असून, या सुधारीत धोरणास सुधार समितीची मान्यता प्राप्त झाली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मान्यतेसाठी सादर केलेला प्रस्ताव दिनांक ०४/०५/२०१७ रोजी भरलेल्या महापालिकेच्या सभेत विचारात घेऊन सदर प्रस्ताव तहकुब करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

## मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शासकीय किंवा महानगरपालिका कर्मचा-यांची नेमणूक करण्याबाबत

**(३८) २९२४३ (१४-०४-२०१७). श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी किमान ५० ते ६० हजार कर्मचारी लागणार असून ते प्रामुख्याने मुंबई महानगरपालिकेतूनच घेतले जाणार असल्याने शिक्षकांना निवडणूक, जनगणनेची कामे लावली जात असल्यामुळे त्याचा परिणाम महानगरपालिकेच्या शाळांवर होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेच्या शाळांवर होणारा परिणाम लक्षात घेता शिक्षकांची या निवडणूक कामातून सुटका करुन त्याजागी शासकीय किंवा महानगरपालिका कर्मचा-यांची नेमणूक करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

सन २०१७ च्या बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी ४७,२४४ कर्मचाऱ्यांच्या सेवा आवश्यक होत्या, त्यापैकी १०,४०९ एवढे शिक्षक होते हे खरे आहे.

तथापि, प्रत्यक्ष निवडणुकीचा दिवस, आधीचा दिवस तसेच प्रशिक्षणाचे २ दिवस याकरिता शिक्षकांची सेवा वापरल्याने त्याचा महानगरपालिका शाळांवर परिणाम झाला हे म्हणणे संयुक्तिक नाही.

(२) सार्वत्रिक निवडणुकीकरिता आवश्यक मनुष्यबळाचा विचार करता व मा. सर्वोच्च न्यायालयाने अपील (सिव्हील) ५६५९/२००७, दिनांक ०६/१२/२००७ मध्ये दिलेल्या आदेशानुसार शिक्षकांना निवडणुकीच्या कामकाजात सहभागी करुन घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद आणि नांदेड येथे मायक्रो फायनान्स कंपन्यांनी नियमबाहय कर्ज देवून वसूलीसाठी महिलांचा छळ सुरु केल्याबाबत**

**(३९) २९३४२ (१५-०४-२०१७). श्री.सुभाष झांबड, श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील अनेक मायक्रो फायनान्स कंपन्या धुणी-भांडी इत्यादी घरकाम करणाऱ्या महिलांना नियमबाहय कर्जे देवून वसूलीसाठी छळ करत असल्याची तक्रार जिल्हाधिकारी यांच्याकडे केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच इतर राज्यातून आलेल्या मायक्रो फायनान्स कंपनी महिला बचतगटांना वेगवेगळी अमिषे दाखवून पतपुरवठा करतात व नंतर त्यांच्याकडून दामदुप्टीने व्याज वसूल करुन अवैद्य सावकारी करण्याचा प्रकार नांदेड जिल्हयात झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मायक्रो फायनान्स कंपनीच्या अवैध सावकारीच्या विरोधात त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी महिला बचतगटाने आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०६-२०१७) :** (१) होय.

विविध मायक्रो फायनान्स कंपन्यांनी नियमबाहय कर्ज देऊन वसुलीसाठी छळ करीत असल्याची तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे दिनांक १५/१२/२०१६ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) होय.

(३) होय.

नांदेड जिल्हयात महिला बचत गटांची मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून आर्थिक अडवणूक होत असल्याबाबत भारीप बहुजन महासंघ, नांदेड यांनी दिनांक १६/१/२०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करुन मागण्यांचे निवेदन सादर केले आहे

(४) प्रस्तुत तक्रारींच्या अनुषंगाने कार्यपालन डायरेक्टर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई, असिस्टंट व्हाईस प्रेसीडंट, मायक्रो फायनान्स इन्स्टीटयूट नेटवर्क, गुरगाव, हरियाणा व पोलीस अधिक्षक, नांदेड यांना कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक ग्रामीण तसेच मॅनेजर, लिड बँक ऑफ महाराष्ट्र, औरंगाबाद यांच्याकडून चौकशी अहवाल मागविला असून मॅनेजर, लिड बँक ऑफ महाराष्ट्र यांजकडून सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे. जनरल मॅनेजर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी त्यांच्या दिनांक ५/४/२०१७ च्या पत्रान्वये मायक्रो फायनान्स कंपन्यांना सदर तक्रारींच्या संदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच गृह विभागाच्या दिनांक १२/४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या विनातारण कर्ज वाटपाबाबत चौकशी करण्यासाठी प्रशासकीय समितीची स्थापना करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**परतूर (जि.जालना) येथील वक्फ मालमत्तेवर अतिक्रमण होत असल्याबाबत**

**(४०) २९३७७ (१२-०४-२०१७). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतूर (जि.जालना) मोठा पंजेतनपीर येथील १६ एकरच्या वक्फ मालमत्तेवर अतिक्रमण झाले असून वक्फ मंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वक्फ मालमत्ता ताब्यात घेण्याबाबत जमिनीची मोजणी व कलम ५४ प्रमाणे कार्यवाही न करता अतिक्रमणधारकांशी संगनमत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०७-२०१७) :** (१) नाही. सदर जमीन तहसिलदार परतूर, जि.जालना यांच्या ताब्यात असून ती वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. यासंदर्भात वक्फ मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले नाही.

(२) नाही. परतूर (जि.जालना) मोठा पंजेतनपीर येथील १६ एकर जमीन सध्या शासनाच्या ताब्यात असून त्यावर एकसाला लावणी करण्यात येत आहे. सदर जमीन वक्फ मंडळाच्या ताब्यात देण्याबाबत तसेच सदरील जागेवर झालेली अतिक्रमणे हटविणेबाबत तहसिलदार, परतूर आणि उपविभागीय अधिकारी, परतूर यांना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून विनंती करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकणातील पाण्याची समस्या दूर करण्यासाठी जलसंधारण खात्यामार्फत लघुसिंचन प्रकल्पाची कामे निधी मिळवून प्रलंबित असल्याबाबत**

**(४१) २९४६९ (१५-०४-२०१७). श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील पाण्याची समस्या दूर करण्यासाठी जलसंधारण खात्यामार्फत लघुसिंचन प्रकल्पाची कामे मंजूर झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशी किती कामे प्रगती पथावर आहेत व फक्त मंजूर होवून कामे सुरु झाले नाहीत अशा प्रकल्पांची संख्या किती आहेत,

(३) असल्यास, मागील दोन वर्षे निधी न मिळाल्याने प्रगतीपथावर असणारी बंद कामांची संख्या किती आहे,

(४) असल्यास, यावर्षी २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात कोकणातील सर्व लघुसिंचन प्रकल्पांना

त्वरीत निधी मिळवुन कामे सुरु करण्याचे नियोजन आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०८-०६-२०१७) :** (१) होय.

(२) लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, ठाणे अंतर्गत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ११३ योजनांची कामे प्रगतीपथावर असून २४ योजनांची भूसंपादन प्रक्रिया चालू असल्याने क्षेत्रियस्तरावर प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नाही.

तसेच सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त नसल्याने व अन्य कारणाने काही योजनांची कामे बंद आहेत.

(३) गेल्या दोन वर्षात निधी अभावी कोणतेही प्रकल्प बंद पडलेले नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात नोटांबदीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(४२) २९६८९ (१७-०४-२०१७). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नोटाबंदीमुळे महसूलात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली असून यावर्षाच्या अर्थसंकल्पातील अंदाज कोलमडण्याची शक्यता निर्माण झाली आहे व विक्रीकर उत्पादन व मुद्रांक शुल्कात सहा हजार कोटीची घट झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यभरात नोटांबदीमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गाळपाचे पैसे वेळेवर मिळत नसल्याने शेतकरी सदर निर्णयाबाबत असंतुष्ट असून कांदा, भाज्यांचे व तांदळाचे दर कमी झाल्याने त्यांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०६-२०१७) :**(१) राज्यात नोटाबंदीनंतर

(अ) विक्रीकर विभागाकडील माहे नोव्हेंबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ अखेरची जमा रुपये ३९०७९ कोटी एवढी असून मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत १९.८२% वाढ झाली आहे.

(ब) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्याकडील नोव्हेंबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ अखेरची जमा रुपये ५८४८.२८ कोटी असून मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत १९% घट झाली आहे.

(क) राज्य उत्पादन शुल्क विभागाकडील माहे नोव्हेंबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७

अखेरची जमा रुपये ३८५९.७५ कोटी एवढी असून मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ३% घट झाली आहे.

(२) नाही. केंद्र शासनामार्फत प्रत्येक हंगामासाठी शेतकऱ्यांच्या उसाला रास्त व किफायतशीर दर (FRP) जाहीर करण्यात येता. त्यानुसार किमान FRP एवढा देणे कारखान्यांवर बंधनकारक असते. सन २०१६-१७ च्या गळीत हंगामामधील देय FRP प्रमाणे कारखान्यांनी ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना अदा केलेल्या देयकांची टक्केवारी १०४.४३ टक्के इतकी आहे. तसेच यावर्षी राज्यात झालेल्या समाधानकारक पावसामुळे शेतमालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झालेले आहे व परिणामी शेतमालाची बाजारात आवक वाढल्यानेच भाव काही प्रमाणात कमी झालेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेने खाजगी वसाहतीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना मुलभूत सुविधा न देण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(४३) ३००८९ (१४-०४-२०१७). अ‍ॅड.राहुल नार्वेकर, अ‍ॅड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील नागरिकांना नागरी सुविधा देण्याची घटनात्मक जबाबदारी असताना मुंबई महानगरपालिकेने खाजगी वसाहतींमध्ये (प्रायव्हेट ले-आऊट) राहणाऱ्या रहिवाश्यांना यापुढे पाणी, मल:निसारण, पर्जन्य जलवाहिन्या, दिवाबत्ती इत्यादी मुलभूत सुविधा न देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खाजगी वसाहतीमध्ये राहणारे नागरिक महानगरपालिकेला तसेच शासनाला कर भरत असतानाही त्यांना सुविधा न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१), (२), (३) व ४) शासनाने सन १९९६ मध्ये तत्कालीन पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली खाजगी अभिन्यासातील रहिवाशांच्या मागणीनुसार अभिन्यासातील नागरी सुविधा विकसित करण्यासंबंधी समिती स्थापन केली होती.

सदर समितीच्या शिफारशी व शासन निर्देशानुसार महानगरपालिका प्रशासनाने धोरणात्मक मार्गदर्शक सुचना तयार करुन दिनांक १८/१/२००५ च्या परिपत्रकान्वये खाजगी वसाहती मुलभुत सुविधा उपलब्ध / सुधारित करण्याची कार्यपध्दत जारी केली.

सदर परिपत्रकानुसार मुलभूत सुविधा उपलब्ध करण्याच्या एकूण खर्चाच्या एक तृतीयांश खर्च संबंधित गृहनिर्माण संस्थानी महापालिकेकडे जमा केल्यानंतर महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या भाग ३०६ मध्ये नमूद कार्यपध्दतीने खाजगी रस्ते सार्वजनिक रस्ते म्हणून जाहिर केल्यानंतर महानगरपालिकेमार्फत मुलभुत सुविधा देण्यात

येतात.

---

**राज्यात मागेल त्या शेतकऱ्याला शेततळे या योजनेंतर्गत**
**अनुदान देण्याच्या निर्णयाबाबत**

**(४४) ३०१८३ (१५-०४-२०१७). श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागेल त्या शेतकऱ्याला शेततळे दिले जाईल व त्यासाठी रुपये दीड लाखाऐवजी ५० हजाराचे अनुदान देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निर्णयाचे स्वरुप काय व त्यानुसार माहे जानेवारी, २०१७ अखेर राज्यातील किती शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२८-०६-२०१७) :** (१) व (२) राज्यातील शेती उत्पादनामध्ये शाश्वतता आणण्यासाठी तसेच शेतकऱ्यांसाठी संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे ५० पैसेपेक्षा कमी आणेवारी असणाऱ्या गावांसाठी “मागेल त्याला शेततळे” ही योजना सुरू करण्यात आली आहे. तसेच, दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये ५० पैसे आणेवारीची अट रद्द करुन सदर योजना कोकण विभागासह संपूर्ण राज्यात सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शेततळयांच्या विविध आकारमानांनुसार कमाल रु. ५०,०००/- इतके अनुदान अनुज्ञेय आहे. माहे जानेवारी, २०१७ अखेर “मागेल त्याला शेततळे” या योजनेंतर्गत ६२८९९ इतक्या शेततळ्यांच्या कामांनी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. त्यापैकी १०८५५ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली होती व ४७९७ शेततळ्यांची कामे सुरु होती सद्य:स्थितीत दिनांक २० मे, २०१७ च्या दैनिक अहवालानुसार आतापर्यंत १०५३०९ शेततळ्यांच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून त्यापैकी ३३८२० शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत व १२४९७ इतकी कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड महानगरपालिका हद्दीतील शहरांतर्गत रस्ते दुभाजकामधील झाडे वाढल्याबाबत**

**(४५) ३०४०४ (१३-०४-२०१७). श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेंतर्गत डिव्हायडर मधील झाडे खुप मोठी झालेली असून व त्याभोवती ताराचे कुंपण म्हणून जाळया लावण्यात आल्या होत्या त्या जाळया कुजुन गेल्या

असून त्या रस्त्यावर मोडून पडत असल्याने अपघात होण्याची शक्यता वाढत आहे व झाडे ही खुप मोठी झाली असून त्याच्या फांदया रस्त्यावर लोमकळत असल्याने महानगरपालिकेने

वेळोवेळी फांदयांची छाटनी न केल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासनाकडून त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१७) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकातंर्गत डीव्हायडर मधील वाढलेली झाडे व त्यांच्या फांदया यांची छाटनी माहे मे मध्ये महानगरपालिकेकडून करण्यात आलेली आहे.

तसेच या झाडांच्या सभोवताली तारांचे कुंपण म्हणून लावण्यात आलेल्या जाळया निघाल्याने त्या पुन्हा बसविण्याची कार्यवाही महानगरपालिकेने केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेगाव व शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील काही बंधा-यात भरपूर पाणी तर काही बंधारे कोरडे पडले असल्याबाबत**

**(४६) ३०४५८ (१५-०४-२०१७). श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव व शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील काही बंधा-यात भरपूर पाणी तर काही बंधारे कोरडे पडल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंधा-यात पाणी उपलब्ध आहे ते कोरडया बंधा-यात सोडून देण्याचे नियोजन करणे महत्वाचे असतानाही जलसंपदा विभाग दुर्लक्ष करीत असल्याने हजारो हेक्टर क्षेत्रावरील पिके पाण्याअभावी करपून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील पिके वाचविण्यासाठी डिंभे धरण येथून घोडनदीत पाणी सोडावे किंवा ज्या बंधा-यात पाणी आहे तेथील पाणी इतर बंधा-यात सोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध विकासकामे पूर्ण होण्याकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत

**(४७) ३०६३२ (१७-०४-२०१७). श्री.नारायण राणे :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात येत्या दोन वर्षात जिल्ह्यातील विविध विकासकामांसाठी रुपये २७०० कोटींचा निधी प्राप्त होईल असे आश्वासन मा.पालकमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.पालकमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने चौकशी करुन विकासकामांकरीता रुपये २७०० कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०७-२०१७) :** (१), (२) व (३) मा. पालकमंत्री, सिंधुदुर्ग यांनी डिसेंबर, २०१६ मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रस्त्यांच्या विकासासाठी सुमारे रु. १४२६ कोटी निधी मंजूर केल्याचे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने संबंधित मा. विधान परिषद सदस्यांना जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडून सविस्तर तपशील उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

---

### बीड येथील बिंदुसरा धरणाच्या सुरक्षिततेबाबत

**(४८) ३०७९३ (१७-०४-२०१७). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथील बिंदुसरा धरणाच्या सुरक्षिततेबाबत शासनाने कोणती सोय केलेली आहे,

(२) तसेच बिंदुसरा येथील सागर दर्शन या विश्रामगृहाची दुरवस्था झाली असून बिंदुसरा प्रकल्पातील पहारेकऱ्यांस राहण्यास कक्ष नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) :** (१) सदर धरणावर, तसेच बुडीत क्षेत्रात खाजगी व्यक्तीस जाण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. यास्तव लाभधारक व नजीकच्या परिसरातील रहिवाशांचे क्षेत्रिय कार्यालयामार्फत प्रबोधन करण्यात येते. तसेच पावसाळा कालावधीत पुर परिस्थिती निर्माण झाल्यावर पोलीस यंत्रणेची तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करण्यात येते.

(२) होय,

बिंदुसरा धरणावर नियमित विश्रामगृह नसून निरिक्षण बंगला आहे. इमारत नादुरुस्त असल्यामुळे, सदर इमारत मागील १५ वर्षापासून वापरात नाही.

या धरणासाठी पहारेकऱ्याचे पद मंजुर नाही. पहारेकऱ्यासाठी स्वतंत्र कक्ष बांधण्यात आलेला नाही. हे खरे आहे.

(३) धरण व बुडित क्षेत्र खाजगी लोकांच्या वहिवाटीसाठी प्रतिबंधित आहे, असा निर्देशीत करणारा कायम स्वरुपी इशारा फलक लावण्याचे नियोजन आहे. वापरात नसलेला निरिक्षण बंगला सद्य:स्थितीत दुरुस्तीसाठी प्रस्तावित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्हयातील प्रकल्पातून बेकायदेशीर पाणी उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४९) ३०८१२ (१५-०४-२०१७). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील सर्व प्रकल्पातून बेकायदेशीर पाणी उपसा होत असल्याने जिल्हा प्रशासनाने कारवाईचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीर पाणी उपसा करणाऱ्यांपैकी किती जणांवर जिल्हा प्रशासनाने कारवाई केली आहे,

(३) तसेच, जिल्हयातील सर्व प्रकल्पातील माहे फेब्रुवारी, २०१७ अखेर पाणी साठयाची स्थिती काय आहे,

(४) आगामी काळात पाणीसाठा टिकुन ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०७-२०१७) :** (१) होय. बीड जिल्हयातील काही प्रकल्पांवर अनधिकृत / बेकायदेशीर पाणी उपसा होत असल्याची तक्रार नगर पंचायत पाटोदाने जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केल्यानंतर "पाण्याचा अनधिकृत उपसा होणार नाही, या अनुषंगाने तातडीने आवश्यक कार्यवाही करावी." अशा आशयाच्या सूचना जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १८/०२/२०१७ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, पाटोदा व तहसिलदार विभागाच्या क्षेत्रिय अधिका-यांना दिल्या आहेत.

(२) जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ०७/०३/२०१७रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत सर्व संबंधित कार्यकारी अभियत्यांनी पाण्याचा अनधिकृत वापर होत नसल्याची बाब निदर्शनास आणुन दिली आहे. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) महामंडळाच्या अधिपत्याखालील १४४ सिंचन प्रकल्पात फेब्रुवारी, २०१७ अखेर एकूण ५०१.९३२ द. ल. घ. मी. उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून तो एकूण प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठयाच्या (८८८.७२० द.ल.घ.मी.) तुलनेत ५६.४७ % एवढा आहे.

(४) जिल्हाधिकारी, बीड व मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी संबधितांना त्यादृष्टीने आवश्यक त्या लेखी सूचना दिल्या आहेत.

---

**दिंडोशी (मुंबई) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मतीमंद अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी विशेष वकिल देण्याबाबत**

**(५०) ३०८७१ (१३-०४-२०१७). श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोशी (मुंबई) पोलीस ठाण्याच्याहद्दीत माहे नोंव्हेबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अल्पवयीन मतीमंद मुलीवर सामुहिक बलात्कार झाला या खटल्यामध्ये मदत करण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी आणि त्यानंतर २५ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही निवेदनांमधील मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१७) :** (१) होय.

(२) सदर निवेदनातील मागण्यांवर कार्यवाही करण्याकरीता निवेदनाच्या प्रती महिला व बाल विकास व विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आल्या आहेत. तसेच, विशेष सरकारी अभियोक्ता नियुक्तीबाबत क्षेत्रिय अधिका-यांकडून अहवाल मागविण्यात आला असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.